विकास कार्यक्रम जिल्हास्तरीय सर्वसाधारण योजनेअंतर्गत प्रशिक्षण प्रस्तावांच्या तांत्रिक मान्यतेच्या अधिकारांचे विकेंद्रीकरण करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग**
**हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**
**शासन निर्णय,क्र.कौविउ-२०२६/प्र.क्र.१४९/कौशल्य-१**
**दिनांक: २६ ऑक्टोबर, २०२६.**

**संदर्भ**: १ कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, मंत्रालय यांचे पत्र क्र. कौविउ २०२०/प्र.क्र.५६/अभियान-१, दि.२१.०४.२०२०,
२. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखालील दि.३०.०९.२०२६ रोजीच्या बैठकीतील सुचना,
३. आयुक्त, कौशल्य विकास यांचे पत्र जा.क्र. कौविका/ता.मा.अधि.बा./२०२६-२७/५२७३, दि. १२.१०.२०२६.

**प्रस्तावना**

किमान कौशल्य विकास कार्यक्रम जिल्हास्तरीय सर्वसाधारण योजनेअंतर्गत जिल्हा वार्षिक योजनेतील प्रलंबित प्रशासकीय व तांत्रिक मान्यतांचा निपटारा जलद गतीने होणे आवश्यक आहे. या अनुषंगाने राज्यस्तरीय शासकीय पुन:रचना समितीच्या बैठकीत जिल्हास्तरीय प्रशिक्षण प्रस्तावांना तांत्रिक मान्यता देण्याचे अधिकार विकेंद्रित करून ते जिल्हास्तरावर प्रदान करण्याचे निर्देशित करण्यात आले आहे. सद्यस्थितीत तांत्रिक मान्यतेची कार्यवाही आयुक्तालय स्तरावरून करण्यात येत असल्याने, प्रक्रियेला गती देण्यासाठी आणि स्थानिक पातळीवर निर्णय प्रक्रियेचे सक्षमीकरण करण्यासाठी हे अधिकार विभागून देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

राज्यस्तरीय शासकीय पुन:रचना समितीच्या बैठकीतील निर्देश व आयुक्तालयाकडून प्राप्त प्रस्तावानुसार, किमान कौशल्य विकास कार्यक्रम व इतर जिल्हास्तरीय योजनांतर्गत प्रशिक्षण प्रस्तावांना तांत्रिक मान्यता (Technical Sanction) देण्याचे अधिकार खालील विवरणपत्रात दर्शविल्यानुसार सक्षम प्राधिकाऱ्यांना प्रदान करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | प्रस्तावांचा तपशिल | प्रस्तावाची आर्थिक मर्यादा | सक्षम प्राधिकारी |
|---|---|---|---|
| १ | किमान कौशल्य विकास कार्यक्रम (जिल्हास्तरीय सर्वसाधारण योजना) तसेच जिल्हा नियोजन समिती, आदिवासी विभाग, जिल्हा खनिकर्म, धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान, इतर शासकीय योजना तसेच इतर शासकीय प्राधिकरणामार्फत निधी उपलब्ध होणाऱ्या विविध योजना | पूर्ण अधिकार | जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता जिल्हा कार्यकारी समिती. |

२.	सदर तांत्रिक मान्यता अधिकार प्रदान करताना परिशिष्ट-अ येथील अटी व शर्तीचे काटेकोर पालन करणे बंधनकारक राहिल.

३.	सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०२६१०२६१७०११५०९०३ असा आहे. हा आदेश डीजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by VAISHALI MANISH SULE
Date: 2026.10.26 17:02:26 +05'30'

**(वैशाली सुळे)**
**उप सचिव,महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
२. मा.मंत्री (कौ.रो.उ.ना.),यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा.मुख्य सचिव, तथा अ.मु.स (नियोजन विभाग),मंत्रालय , मुंबई
४. सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई,
५. आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालय, कोकण भवन, नवी मुंबई,
६. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास संस्था, कफ परेड, मुंबई,
७. महालेखापाल ( लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई,
८. महालेखापाल ( लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर,
९. महालेखापाल ( लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई,
१०. महालेखापाल ( लेखा परीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर,
११. अधिदान व लेखा अधिकारी ,मुंबई,
१२. निवासी व लेखा परीक्षा अधिकारी ,मुंबई,
१३. सर्व विभागीय आयुक्त/सर्व जिल्हाधिकारी /आयुक्त , सर्व महानगर पालिका, /सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी/ मुख्याधिकारी ,सर्व नगर परिषद/नगर पंचायती,
१४. उपसंचालक, विभागीय मुख्यालय कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, मुंबई /पुणे / नागपूर/अमरावती/औरंगाबाद /नाशिक,
१५. सर्व कार्यासने, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग,मंत्रालय, मुंबई,
१६. निवड नस्ती (कौ,१).

(शासन निर्णय,क्र.कौविउ-२०२६/प्र.क्र.१४९/कौशल्य-१, दि. २६ ऑक्टोबर, २०२६ चे सहपत्र)

परिशिष्ट अ

| | |
|---|---|
| १ | प्रस्तावास कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता जिल्हा कार्यकारी समितीची मान्यता असावी. |
| २ | प्रस्तावातील ज्या अभ्यासक्रमांची वैधता त्या आर्थिक वर्षातील मार्च अखेर पर्यंतची आहे अशा सर्व अभ्यासक्रमांच्या वैधता संपुष्टात येण्यापुर्वी प्रशिक्षण तुकडींचे मुल्यमापन पुर्ण होईल याची जबाबदारी ही कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता जिल्हा कार्यकारी समितीची राहील. |
| ३ | तांत्रिक मान्यता प्रदान केल्यानंतर, मान्यता दिलेल्या प्रस्तावामध्ये कोणतेही परस्पर बदल करू नये. बदल करावयाचे झाल्यास त्यास संबंधित समितीची पुर्वपरवानगी घेणे आवश्यक राहील. |
| ४ | कार्यक्रमाची गुणवत्तापूर्वक अंमलबजावणी करीता निवड केलेल्या प्रशिक्षण संस्थेची प्रशिक्षण सुरू होण्यापूर्वी तसेच प्रशिक्षण प्रगतीपर/मध्यावधी असताना प्रशिक्षण तुकड्यांची प्रत्यक्ष भेटीद्वारे सनियंत्रण व पर्यवेक्षण करण्याची जबाबदारी संबंधित सक्षम अधिकारी यांची राहील. |
| ५ | प्रशिक्षण तुकड्यांचे मुल्यमापन हे महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ (MSBSVET) यांचेमार्फत विहित कालमर्यादेत करण्यात यावे तसेच प्रशिक्षण संस्थेमध्ये मुल्यमापन सुरू असताना जिल्हा कार्यालयातील जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रातील सहायक आयुक्त/ प्रतिनिधी यांनी उपस्थित राहून पर्यवेक्षण करावे. |
| ६ | प्रशिक्षण तुकड्यांमधील प्रशिक्षणार्थ्यांच्या हजेरीकरीता IRIS Aadhar Enabled Biometric Attendance System (AEBAS) अथवा MSDE यांच्या मार्गदर्शक सुचनाप्रमाणे Face Attendance या प्रणालीचा उपयोग करणे बंधनकारक राहील. |
| ७ | प्रशासकिय मान्यतेनूसार मंजूर निधीच्या तरतुदीपेक्षा अधिक रक्कमेचे कार्यादेश वाटप निर्गमित करण्यात येऊ नये. |
| ८ | प्रस्तावित अभ्यासक्रम व उद्दीष्ट जिल्हा कौशल्य विकास आराखडा सुसंगत असल्याबाबत खात्री करावी. |
| ९ | किमान कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत प्रशिक्षित उमेदवारांपैकी ७५% उमेदवारांना रोजगार किंवा स्वंयरोजगार उपलब्ध करून देणे बंधनकारक राहील. |
| १० | कार्यक्रमाचा त्रैमासिक प्रगती अहवाल संबंधित कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता जिल्हा कार्यकारी समिती व कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय यांना सादर करण्यात यावा.तसेच सदर कार्यक्रमाचा सहामाही अहवाल आयुक्त यांनी शासनास सादर करावा. |